दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २६१ । गुरुवार १६ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## शिर्डीतील अवजड वाहतूक १७ ते १९ जुलै दरम्यान पर्यायी मार्गाने

### आंतरराष्ट्रीय धार्मिक स्थळ असलेल्या शिर्डी शहरात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शनिवार व रविवारच्या सुट्ट्यांमुळे भाविकांची आणि वाहनांची प्रचंड गर्दी होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील सावळिविहीर फाटा ते शिर्डी दरम्यान रस्त्या दुरुस्तीचे काम सुरू असून, रस्ता एका बाजूने खोदल्यामुळे संपूर्ण वाहतूक एकाच बाजूने सुरू आहे. या मार्गावर अवजड वाहनांमुळे दिवसातून ३ ते ४ वेळा मोठी वाहतूक कोंडी होत आहे.

हा महामार्ग शिर्डी शहरातून थेट साईबाबा मंदिरासमोरून जात असल्याने भाविकांची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक महेश मोहनराव येसेकर यांनी अवजड वाहने पर्यायी मार्गाने वळवण्याचा प्रस्ताव पोलीस अधीक्षकांकडे सादर केला आहे.

त्यानुसार दि. १७ जुलै सकाळी ६ ते दि. १९ जुलै रात्री ११ वाजेपर्यंत वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे.
अहिल्यानगरकडून मनमाडकडे जाणारी अवजड वाहने: कोल्हार / बाभळेश्वरलोणी तळेगाव पोहेगाव झगडे फाटा पुणतांबा चौफुली या मार्गाने जातील.

मनमाडकडून अहिल्यानगरकडे जाणारी अवजड वाहने: पुणतांबा चौफुली झगडे फाटा पोहेगाव तळेगाव लोणी कोल्हार / बाभळेश्वर या मार्गाने वळवण्यात येतील.

## उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी सकल मातंग समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा

### अनुसूचित जातींच्या आरक्षणातील लाभवंचित घटकांना न्याय देण्याची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण तातडीने लागू करून लाभवंचित घटकांना न्याय द्यावा, या प्रमुख मागणीसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य महामोर्चा काढण्यात आला. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा अधिकार राज्य सरकारांना असल्याचा ऐतिहासिक निर्णय दिला. या निर्णयामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, निर्णयानंतरही महाराष्ट्र शासनाने अद्याप उपवर्गीकरणाची अंमलबजावणी न केल्याने समाजामध्ये तीव्र नाराजी आहे.

मातंग समाजाला नोकरी, शिक्षण तसेच विविध शासकीय योजनांमध्ये अपेक्षित प्रतिनिधित्व मिळालेले नसल्याने सन १९८० पासून उपवर्गीकरणाची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. सन २०२२ पासून विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष आणि समाजातील मान्यवरांनी एकत्र येत 'सकल मातंग समाज महाराष्ट्र'च्या माध्यमातून हा लढा अधिक व्यापक केला आहे. या आंदोलनांतर्गत 'जवाब दो आंदोलन', 'दवंडी आंदोलन' आणि 'जनआक्रोश महाआंदोलन' यांसारखे विविध आंदोलनात्मक कार्यक्रम राबविण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महाराष्ट्र शासनाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी निवृत्त न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या ■ पान ४ वर

## श्रीरामपुरात एम.डी. तस्कराला अटक, अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखा आणि श्रीरामपूर शहर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत श्रीरामपूर-संगमनेर रस्त्यावरील नांदूर शिवार, अस्तगाव फाटा येथे सापळा रचून पोलिसांनी एम.डी. (मेफेड्रोन) विक्रीसाठी आलेल्या एका तस्कराला अटक केली असून, त्याच्याकडून २ लाख ५२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सोहेल जुबेर शेख (वय २७, रा. मिल्लतनगर, वॉर्ड नं. ०२, श्रीरामपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर त्याचा साथीदार असीफ मुनीर शेख (रा. बेलापूर, ता. श्रीरामपूर) हा सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांचे पथक गस्त घालत असताना, सोहेल शेख हा मोपेड दुचाकीवरून एम.डी. ड्रग्ज विकण्यासाठी अस्तगाव फाट्याजवळ येणार असल्याची गुप्त माहिती मिळाली. श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्या पथकासह पोलिसांनी तात्काळ अस्तगाव फाट्यावर सापळा रचला. संशयास्पद रित्या थांबलेल्या सोहेलला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे तीव्र वासाचा अंमली पदार्थ आढळून आला.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल रमीजराजा आतार यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ विरोधी कायदा कलम ८(क), २१(ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर पोलीस करत आहेत.

## अवैध दारू धंद्यांवर छाप्यात साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

### एलसीबीची श्रीरामपूर, मिरजगाव व भिंगार कॅम्प परिसरात कारवाई ४ गुन्हे दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिले आहेत. या आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथकांनी धडक मोहीम राबवून श्रीरामपूर शहर, मिरजगाव आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू धंद्यांवर छापे टाकले. या कारवाईत एकूण ४ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ४ लाख ५९ हजार ८३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या तीन वेगवेगळ्या पथकांनी १५ जुलै रोजी ही कारवाई केली. श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत ४,३५,३०० रुपयांची देशी-विदेशी ■ पान ४ वर



### छत्रपती संभाजीनगरला शुद्ध व नियमित पाणीपुरवठ्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण /छत्रपती संभाजीनगर –** शहराला जायकवाडी प्रकल्पातून शुद्ध, नियमित आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी सुरू असलेल्या महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजनेचे काम गतीने पूर्ण करावे, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी संबंधित विभाग, महापालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि कंत्राटदारांना कामाचा वेग वाढविण्याच्या सूचना दिल्या. मुख्यमंत्री म्हणाले, अर्धवट राहिलेली पाण्याच्या टाक्यांची कामे, वितरण व्यवस्था आणि हायड्रोलिक टेस्टिंग तातडीने पूर्ण करावे. शेवटच्या नागरिकापर्यंत शुद्ध व नियमित पाणी पोहोचविणे ■ पान ४ वर

## राजकीय दबाव झुगारून गुन्हेगारी टोळ्यांचा बिमोड करा

### आयजी संजय येनपुरे यांचे पोलिसांना आदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नाशिक परिक्षेत्राचे नवनियुक्त विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे सध्या कमालीच्या ॲक्शन मोडमध्ये असून गुन्हेगारी विश्वाला मुळासकट उपटून टाकण्यासाठी त्यांनी पोलीस प्रशासनाला फ्री-हँड दिला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीमुळे जिल्ह्याची प्रतिमा मलीन होत असल्याबद्दल त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. 'गुन्हेगारांना कोणताही राजकीय वरदहस्त असो, कुठलाही राजकीय दबाव न घेता गुन्हेगारी टोळ्यांवर थेट आणि कठोर कारवाई करा,' असे खणखणीत आणि अत्यंत कडक निर्देश आयजी संजय येनपुरे यांनी जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**राजकीय दबावाला बळी पडू नका; कर्तव्यदक्ष आयजीचा कडक इशारा**
अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीत आयजी येनपुरे यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. जिल्ह्यात घडणाऱ्या काही गंभीर गुन्ह्यांमुळे जिल्ह्याच्या कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊन जिल्ह्याची प्रतिमा डागाळत आहे, याकडे त्यांनी अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

ते स्पष्ट शब्दांत म्हणाले की, नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. गुन्हेगारी प्रवृत्ती ठेचून काढताना जर कोणी राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केला, तर त्याला अजिबात बळी पडू नका. कायदा सर्वांसाठी समान आहे, त्यामुळे संघटित गुन्हेगारी, अवैध धंदे आणि शांतता भंग करणाऱ्या टोळ्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी थेट त्यांच्या घरांवर आणि तळांवर धडक कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले.

**बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे व वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती**
या उच्चस्तरीय आणि संवेदनशील आढावा बैठकीला जिल्ह्यातील संपूर्ण वरिष्ठ पोलीस फौजफाटा उपस्थित होता. यामध्ये प्रामुख्याने:श्री. मुमक्का सुदर्शन (जिल्हा पोलीस अधीक्षक)श्री. वैभव कलुबर्मे(अप्पर पोलीस अधीक्षक) श्री. सोमनाथ वाकचौरे (अप्पर पोलीस अधीक्षक यांच्यासह जिल्ह्यातील ■ पान ४ वर

## महापालिका कर्मचाऱ्यांवरील अतिरिक्त कामाचा ताण तातडीने कमी करा

### राजेंद्र फुलारी यांच्या आत्महत्येनंतर महापालिका कामगार युनियन आक्रमक; आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन । अतिरिक्त शासकीय कामे कमी न झाल्यास बेमुदत तीव्र आंदोलनाचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेतील कामगार व कर्मचाऱ्यांवर दिवसेंदिवस वाढत असलेल्या अतिरिक्त कामाच्या ताणामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती आता ऐरणीवर आली आहे. आरोग्य विभागातील कर्मचारी कै. राजेंद्र बबन फुलारी यांनी मानसिक तणावातून आत्महत्या केल्याच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनने तीव्र भूमिका घेत महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे. कामगारांवरील अतिरिक्त शासकीय कामांचा बोजा तातडीने कमी करावा, अन्यथा बेमुदत तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी दिला.

युनियनच्या निवेदनानुसार, सन २०१६ मध्ये शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेत २,८७१ कामगार-कर्मचाऱ्यांची पदे मंजूर आहेत. मात्र दर महिन्याला २५ ते ३० कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने सध्या केवळ सुमारे १,६०० कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून अत्यावश्यक सेवा चालविणे ही प्रशासनासाठी तारेवरची कसरत ठरत आहे. अशा परिस्थितीतही निवडणुका, जनगणना, एसआयआर अंतर्गत बीएलओची कामे, आपत्कालीन व्यवस्थापन, बोगस मतदार शोध मोहीम यांसारखी अतिरिक्त शासकीय कामे महानगरपालिका कर्मचाऱ्यांवर सोपविली जात असल्याने त्यांच्यावर प्रचंड मानसिक व शारीरिक ताण निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महानगरपालिकेतील रस्ते, स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, महसूल, कर वसुली यांसह सर्व सेवा अत्यावश्यक स्वरूपाच्या आहेत. मात्र कर्मचारी संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने दैनंदिन कामकाज करणेही कठीण झाले आहे. तरीदेखील जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत महानगरपालिका कर्मचाऱ्यांची विविध शासकीय कामांसाठी नियुक्ती केली जाते. त्यामुळे महापालिकेच्या नियमित कामकाजावर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप युनियनने केला आहे.

निवेदनात महापालिकेच्या आर्थिक स्थितीकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असून कर्मचाऱ्यांची सुमारे २० कोटी रुपयांची देणी प्रलंबित आहेत. याशिवाय वीज बिल, ठेकेदारांची बिले व इतर देणी मिळून सुमारे ३३२ कोटी रुपयांची थकबाकी आहे.

महापालिकेचे प्रमुख उत्पन्न स्रोत असलेल्या मालमत्ता कराची बिले देणे, वसुली करणे आणि थकबाकी वसूल करणे ही जबाबदारीही कर्मचाऱ्यांवर आहे. मात्र अतिरिक्त शासकीय कामांमुळे ही कामे वेळेत होत नाहीत. असे असतानाही महसूल विभागातील ■ पान ४ वर

## अंबिका देवस्थान, देविभोयरे ट्रस्टला ब वर्ग दर्जा

### आमदार काशिनाथ दातेंच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** देविभोयरे येथील ग्रामदैवत अंबिका देवस्थान ट्रस्टला अखेर शासनाकडून ब वर्ग दर्जा प्राप्त झाला असून, या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे देवस्थानाच्या विकासासाठी नवे पर्व सुरू झाले आहे. यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी मंत्रालयीन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून शासनाची मंजुरी मिळवून दिली. या यशाबद्दल देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि भाविकांनी आमदार दाते सर यांचा जाहीर सत्कार करून मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

अंबिका देवस्थान हे देविभोयरेसह परिसरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असून, अनेक वर्षांपासून या देवस्थानाला ब वर्ग दर्जा मिळावा, अशी ग्रामस्थांची सातत्यपूर्ण मागणी होती. हा दर्जा मिळाल्यामुळे देवस्थानाच्या प्रशासनात अधिक सुसूत्रता येणार असून, विकासकामांना गती मिळणार आहे. तसेच भाविकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याबरोबरच देवस्थानाच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनविषयक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे.

या मागणीचे गांभीर्य लक्षात घेत आमदार काशिनाथ दाते सर यांनी वेळोवेळी संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठका घेतल्या. मंत्रालयीन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, प्रशासकीय प्रक्रिया आणि मंजुरीचा प्रत्येक टप्पा स्वतः लक्ष घालून पूर्ण केला. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अखेर शासनाने देवस्थानाला ब वर्ग दर्जा मंजूर केला.

यावेळी सत्काराला उत्तर देताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, ''देवस्थान ही केवळ पूजा-अर्चेची स्थळे नसून आपल्या संस्कृती, परंपरा आणि सामाजिक ऐक्याची केंद्रे आहेत. अंबिका देवस्थानाला ब वर्ग दर्जा मिळणे हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून, संपूर्ण देविभोयरे आणि परिसरातील भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान आहे. या देवस्थानाच्या विकासासाठी भविष्यातही आवश्यक निधी, सुविधा आणि पायाभूत विकासकामांसाठी शासन स्तरावर सातत्याने प्रयत्न करत राहणार आहे. ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### वारीत सेवाभावाचा आरोग्यसंगम! सहाशे वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी




**अहिल्यानगर- आषाढी एकादशीच्या वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत सेवाभावाचा आदर्श उपक्रम उमंग फाउंडेशन आणि जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. युवक कल्याण योजनेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात तब्बल सहाशे वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. डॉक्टरांनी प्रत्येक वारकऱ्याची सखोल वैद्यकीय तपासणी करून आवश्यकतेनुसार औषधांचे वाटप केले. याशिवाय वारकऱ्यांना फळांचेही वितरण करण्यात आले. शहरातील कोंबडी मळा, सोलापूर चौक आणि वाळुंज परिसरात आयोजित या शिबिराला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांसाठी अशा प्रकारची आरोग्य सेवा अत्यंत उपयुक्त ठरली. तपासणीदरम्यान रक्तदाब, शारीरिक तक्रारी, थकवा, ताप, पायदुखी आदी समस्यांवर मार्गदर्शन करून आवश्यक औषधोपचार देण्यात आले. यावेळी उमंग फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. संतोष गिऱ्हे, पोपट बनकर, डॉ. धीरज ससाणे, वैशाली कुलकर्णी, महेंद्र गिऱ्हे, शरद वाघमारे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने वारकऱ्यांची नोंदणी, तपासणी आणि औषध वाटपाची व्यवस्था सांभाळली. यावेळी बोलताना डॉ. संतोष गिऱ्हे म्हणाले की, वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक परंपरेचे प्रतीक आहे. पंढरीच्या दिशेने श्रद्धेने निघालेल्या वारकऱ्यांचे आरोग्य उत्तम राहणे ही काळाची गरज आहे. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम ठेवण्यासाठी अशा आरोग्य शिबिरांचे विशेष महत्त्व आहे. त्यामुळे दरवर्षी हा उपक्रम सातत्याने राबविला जात असून भविष्यातही ही सेवा सुरू राहणार असल्याचे सांगितले.**

# श्री क्षेत्र सरला बेट वारकरी पायी पालखी दिंडी सोहळ्याचे अहिल्यानगरात जल्लोषात स्वागत

**गोकुळनगर, नंदनवननगर, पवननगर व साईरामनगर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीनिमित्त श्रीक्षेत्र सरला बेट येथील श्री संत गंगागिरी महाराज वारकरी पायी पालखी दिंडी सोहळ्याचे अहिल्यानगर शहरात आगमन होताच श्री गुरु हरिभाऊ महाराज पाटील तपस्फूर्ती सोहळा समितीच्या वतीने दिंडीचे मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. टाळ–मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल नामाच्या जयघोषात तसेच जेसीबीच्या साहाय्याने करण्यात आलेल्या भव्य पुष्पवृष्टीने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

गोकुळनगर, नंदनवननगर, पवननगर व साईरामनगर परिसरातील नागरिकांनी पारंपरिक व धार्मिक पद्धतीने पालखी सोहळ्याचे स्वागत केले. वारकऱ्यांवर पुष्पवृष्टी करून विठ्ठलभक्तांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यावेळी पैलवान शिवाजी चव्हाण, ह.भ.प. संदीप महाराज खोसे, सचिन पवार, शिवाजी पवार, कारभारी शेंडे, युवराज चव्हाण, रंजना उकिरडे तसेच गोकुळनगर, नंदनवननगर, पवननगर व साईरामनगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी श्री गुरु हरिभाऊ महाराज पाटील तपस्फूर्ती सोहळा समितीच्या वतीने पालखी सोहळ्यावर जेसीबीच्या साहाय्याने भव्य पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच वारकरी संप्रदायाचे ज्येष्ठ प्रवचनकार ह.भ.प. रामगिरी महाराज यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पैलवान शिवाजी चव्हाण म्हणाले की, श्रीक्षेत्र सरला बेट वारकरी पायी पालखी दिंडी सोहळ्याचे स्वागत करण्याचे भाग्य श्री गुरु हरिभाऊ महाराज पाटील तपस्फूर्ती सोहळा समितीला लाभले आहे. वारकऱ्यांची सेवा हीच पांडुरंगाची सेवा असून ही सेवा म्हणजे आपल्या संत परंपरेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राला लाभलेली शेकडो वर्षांची वारकरी परंपरा ही आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. संतांनी दिलेले विचार, अध्यात्म आणि समाजप्रबोधनाचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करत ही अखंड परंपरा अधिक जोमाने पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

# महापालिकेच्या ऑनलाईन प्रणालीतील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेत नुकतीच सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन ई-एमबी प्रणालीमुळे ठेकेदारांना विविध तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत असून, कामकाजात मोठा विलंब होत आहे. या समस्यांसह अतिरिक्त जीएसटी, अनामत रक्कम आणि इतर प्रलंबित प्रश्नांबाबत अहिल्यानगर ठेकेदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी मांडण्यात आलेल्या सर्व मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत येत्या चार दिवसांत तातडीने तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त डांगे यांनी दिले.

या बैठकीस आयुक्त यशवंत डांगे, शहर अभियंता मनोज पारखे, ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष सचिन लोटके, शोएब शेख, अनुज सोनीमंडलेचा, ओमकार देशमुख, अभिजित काळे, आनंद पुंड, राहुल पडोळे, दीपक कावळे, राहुल बोरूडे, नितीन फुलसौंदर, प्रसाद साळी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

ठेकेदार संघटनेने आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद केले की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरात रस्ते, इमारती, उद्याने, कंपाउंड, सभामंडप आदी विविध विकासकामे नोंदणीकृत ठेकेदारांमार्फत केली जातात. यापूर्वी सर्व कामांची मेजरमेंट बुक (एमबी) प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने होत होती. त्यामुळे कामकाज जलद गतीने पूर्ण होत होते.

मात्र, गेल्या काही दिवसांपासून सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन ई-एमबी प्रणालीमुळे अनेक तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. अवघ्या दहा मिनिटांत पूर्ण होणाऱ्या प्रक्रियेस आता तब्बल दीड महिना लागत असल्याने ठेकेदारांचे आर्थिक व प्रशासकीय नुकसान होत आहे. याशिवाय ई-प्रणालीद्वारे प्रक्रिया करण्यासाठी ठेकेदारांकडून स्वतंत्र शुल्क आकारले जात असून, ही शुल्क आकारणी तत्काळ बंद करावी, अशी मागणी करण्यात आली. जिल्हास्तरीय विकासकामांमध्ये ठेकेदारांना अतिरिक्त जीएसटीचा आर्थिक भार सहन करावा लागत असून, तो कमी करण्यात यावा, अशी मागणीही बैठकीत करण्यात आली.

तसेच प्रत्येक विकासकामासाठी करारानुसार तीन वर्षांनंतर अनामत रक्कम (सिक्युरिटी डिपॉझिट) परत मिळणे अपेक्षित असताना अनेक ठेकेदारांना अद्याप ती रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे अनामत रक्कम परत मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व वेळेत पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली.

# पारनेरमध्ये पीएम सूर्य घर विशेष अभियानाचा उद्या शुभारंभ

**खासदार नीलेश लंके यांची उपस्थिती**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** केंद्र शासनाच्या पीएम सूर्य घर मोफत वीज योजना अंतर्गत पारनेर तालुक्यातील नागरिकांना सौरऊर्जेचा लाभ मिळावा, वीजबिलाचा आर्थिक भार कमी व्हावा आणि प्रत्येक घर ऊर्जा स्वावलंबी व्हावे, या उद्देशाने विशेष जनजागृती व नोंदणी अभियानाचा शुभारंभ शुक्रवार (दि. १७) रोजी सकाळी १० वाजता खा. नीलेश लंके यांच्या पारनेर येथील जनसंपर्क कार्यालयात होणार आहे. या अभियानाचे उद्घाटन लोकप्रिय खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते होणार आहे.

या अभियानाअंतर्गत नागरिकांना घरगुती सौरऊर्जा प्रणाली बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून अनुदानाचा लाभ मिळणार आहे. यामध्ये १ किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, २ किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि ३ किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध होणार आहे. त्यामुळे घरगुती वीजबिलात बचत होण्याबरोबरच स्वच्छ, हरित आणि शाश्वत ऊर्जेच्या वापराला चालना मिळणार आहे.



खासदार नीलेश लंके यांच्या पुढाकारातून लाभार्थ्यांचा आर्थिक सहभाग शक्य तितका कमी राहील, यासाठी आवश्यक समन्वय करण्यात आला असून, तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. दि. १७ जुलै ते १७ ऑगस्ट या कालावधीत संपूर्ण पारनेर तालुक्यात हे विशेष नोंदणी अभियान चालविण्यात येणार आहे. इच्छुक नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी करून शासनाच्या या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या उद्घाटन सोहळ्यास कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी, नगरपंचायतीचे लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच व सदस्य, विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, निलेश लंके प्रतिष्ठान, आपला मावळा संघटना, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच तालुक्यातील उद्योजक, शेतकरी, युवक, महिला आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर नागरिक उपस्थित राहणार आहेत.

# यांत्रिकी अभियांत्रिकी विषयात प्रा. डॉ. मंदार बिडवे यांना पीएच.डी.

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, अहिल्यानगर येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक प्रा. डॉ. मंदार मारुती बिडवे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी यांत्रिकी अभियांत्रिकी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या विषयावर त्यांनी केलेल्या संशोधनाला शैक्षणिक तसेच औद्योगिक क्षेत्रातून विशेष दाद मिळत आहे.

डॉ. बिडवे यांच्या संशोधनाचा विषय ''प्रॉडक्ट लाईफ सायकल ॲनालिसिस अँड असेसमेंट ऑफ लिथियम-आयन बॅटरी फॉर प्रायॉरिटायझिंग द फॅक्टर्स ऑफ इफेक्टिव्ह फाइव्ह आर'' असा असून, हे संशोधन त्यांनी प्रा. डॉ. स्वानंद कुलकर्णी, एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

पीएच.डी. संशोधनादरम्यान त्यांनी तीन आंतरराष्ट्रीय संशोधन निबंध प्रकाशित केले. त्यापैकी दोन निबंध स्कोपस-इंडेक्स्ड नियतकालिकांमध्ये, तर एक संशोधन निबंध एससीआय-इंडेक्स्ड जर्नल ऑफ एनर्जी स्टोरेज या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रतिष्ठित नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या संशोधनाची गुणवत्ता आणि उपयुक्तता यामुळे शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात त्याची विशेष दखल घेण्यात आली आहे.

शैक्षणिक क्षेत्रातही डॉ. बिडवे यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांनी मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (बाटू), लोणेरे यांच्या

# विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण अभियानातील त्रुटी दूर करून मुदतवाढ देण्याबाबत शिवसेनेचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरात सध्या विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण अभियान सुरू आहे. या अभियानाच्या माध्यमातून मतदार यादी अचूक व पारदर्शक करण्याचा उद्देश अत्यंत महत्त्वाचा असून शिवसेना, अहिल्यानगर शहराच्या वतीने या प्रक्रियेस पूर्ण सहकार्य आहे. मात्र प्रत्यक्ष कामकाजात अनेक गंभीर त्रुटी व अडचणी निदर्शनास येत असून त्यामुळे पात्र मतदारांमध्ये संभ्रम व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.याबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांना शिवसेनेच्या वतीने देण्यात आले यावेळी शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम ,गटनेते दत्ता कावरे ,जेष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे ,नगरसेवक संजय शेंडगे ,शाम नळकांडे ,संदीप दातरंगे , काका शेळके ,परेश



लोखंडे ,विकी लोखंडे ,रणजित परदेशी ,अण्णा घोलप ,दीपक थोरात ,आबासाहेब गुंड ,योगेश गलांडे ,प्रताप गडाख ,विनोद शिरसाठ आदी उपस्थित होते

अनेक भागांत नियुक्त करण्यात आलेले बीएलओ ( ) घराघरात जाऊन पडताळणी करण्याऐवजी एका ठिकाणी बसून केवळ अर्जांचे वाटप करत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त होत आहेत. शासनाने निश्चित केलेल्या पद्धतीनुसार प्रत्येक मतदारापर्यंत प्रत्यक्ष पोहोचून माहितीची पडताळणी करणे आवश्यक असताना अनेक ठिकाणी ही प्रक्रिया होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक पात्र मतदारांपर्यंत आवश्यक माहिती पोहोचत नाही.

तसेच मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्यापूर्वी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करण्यात यावा, संबंधित व्यक्ती अथवा त्यांच्या कुटुंबीयांना योग्य ती नोटीस व संधी देण्यात यावी आणि त्यानंतरच नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. कोणत्याही प्रकारची खातरजमा न करता किंवा पंचनामा न करता नावे वगळण्यात आल्यास अनेक पात्र नागरिक मतदानाच्या मूलभूत अधिकारापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या कार्यवाहीस त्वरित आळा घालण्यात यावा.

# राशिनमध्ये निधीचा अपहार व भ्रष्टाचाराविरोधात जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कर्जत तालुक्यातील राशिन येथील विविध विकासकामांमध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराची चौकशी, अपंग सहायता निधीच्या गैरवापराची सखोल तपासणी, रखडलेल्या विकासकामांना गती देणे तसेच प्रशासकीय दिरंगाईबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते कमलेश साळवे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू केलेले आमरण उपोषण अखेर दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि.१४ जुलै) लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.

जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांनी दिलेल्या लेखी पत्रात, या सर्व तक्रारींची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कर्जत पंचायत समितीचे



गटविकास अधिकारी यांना निर्देश देण्यात आल्याचे नमूद केले आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच नियमानुसार पुढील प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. या लेखी आश्वासनानंतर कमलेश साळवे यांनी उपोषण मागे घेतले.

साळवे यांनी प्रशासनाकडे सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राशिन येथील विविध विभागांमार्फत राबविण्यात आलेली अनेक विकासकामे आजही अपूर्ण अवस्थेत आहेत. अनेक कामांचा दर्जा निकृष्ट असून, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याची शक्यता आहे. वारंवार तोंडी व लेखी तक्रारी करूनही संबंधित अधिकारी कोणतीही ठोस कारवाई करत नसून, दोषींना संरक्षण देत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

सन २०२१ ते २०२४ या कालावधीत ग्रामपंचायत राशिनकडे उपलब्ध झालेला अपंग सहायता निधी अद्याप लाभार्थ्यांसाठी खर्च करण्यात आलेला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा निधी नेमका कुठे गेला, कोणाच्या आदेशाने वापरण्यात आला किंवा वळविण्यात आला का, याची सखोल चौकशी करून संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी,

## शब्दकोडे क्रमांक : ७

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | | ■ | ४ | | ५ | ६ | ■ |
| | ■ | ७ | ८ | | ■ | ९ | | ■ | १० | | |
| ११ | १२ | ■ | | ■ | १३ | | | | ■ | | ■ |
| ■ | १४ | १५ | | १६ | ■ | १७ | | ■ | १८ | | १९ |
| २० | | | ■ | २१ | २२ | ■ | २३ | २४ | | ■ | |
| | ■ | २५ | २६ | | | | ■ | | ■ | २७ | |
| २८ | २९ | ■ | | ■ | | ■ | ३० | | | | ■ |
| ■ | ३१ | | ■ | ३२ | ■ | ३३ | | | ■ | ३४ | ३५ |
| ३६ | | ■ | ३७ | | | | | ■ | ३८ | ■ | |
| | ■ | ३९ | ■ | | ■ | | ■ | ४० | ■ | ४१ | |
| ४२ | | | | ■ | ४३ | ■ | ४४ | | ४५ | ■ | |
| | ■ | | ■ | ४६ | | | ■ | ४७ | | | ■ |

**आडवे शब्द** : १. लोहयुक्त एक पालेभाजी ३. दंत ४. वारसा ७. बलफ - उलट लिहा ९. आईचा भाऊ १०. गुंडांना पकडण्यासाठी पोलिस रचतात ते षडयंत्र ११. जीवनासाठी ऑफिसमध्ये आपण नेतो १३. दक्ष १४. विनाकारण केलेले बोलणे १७. पावसाची झड १८. वसा चालवणारा २०. धाक २१. गोंद २३. अंदाज २५. चार धामण २७. हिंदीत-उपाय २८. रान ३०. धोकेबाज ३१. केसांची बट ३३. महापुरुषांचे जीवन चरित्र लिहिलेले पुस्तक ३४. स्वर ३६. रब-उलट लिहा ३७. आकाशात भारतीय सीमांचे रक्षण करणारे एक दल ३८. इंग्रजीत-जा ४१. सोबत ४२. जंगलात लागलेली आग ४४. पापी ४६. सोबत ४७. मृदू **उभे शब्द** :१. जेवताना खाव्याच्या कुरकुरीत पदार्थ २. त्रिदोषांपैकी एक ३. दबाव ४. विमा असलेला ५. कासवाच्या शर्यतीतील एक स्पर्धा ६. एक हुंगण्याची पूड ८. उभंग ९. मावशीच्या नात्यातला १२. एक मुघल शासक १५. पाण्याचे लहान तळे १८. वावर १९. पिकनिक २०. माणसांचा जमलेला घोळका २२. मज्जा २४. आठवणीत राहिलेला संस्मरणीय कार्यक्रम २६. बट्टा २७. उपस्थित २९. दृष्ट ३०. एखाद्याकडे पुरवलेले विशेष लक्ष ३२. प्रश्न ३३. एक पक्षी ३५. वस्ती ३६. इराक शहराची राजधानी ३९. पुत्र ४०. जपून ठेवणे ४३. पक्षी ४५. हस्त

### शब्दकोडे क्रमांक : ६ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गा | य | ■ | घो | डा | ■ | म | ध | मा | शी | ■ | पा |
| व | ■ | ग | ळ | ■ | मा | क | ड | ■ | र | य | त |
| ■ | थ | वा | ■ | पी | ■ | रं | ■ | स | ■ | म | ळ |
| मै | ■ | र | जा | ■ | म | द | न | मो | ह | न | ■ |
| दा | वा | ■ | व | रा | त | ■ | व | र | म | ■ | गा |
| ■ | स | रा | ई | त | ■ | थ | ल | ■ | द | म | डी |
| बो | रू | ■ | बा | ■ | धा | क | ■ | न | म | न | ■ |
| ल | ■ | स | पू | त | ■ | वा | ज | वी | ■ | न | फा |
| का | र | ण | ■ | न | दी | ■ | व | ■ | क्षी | ■ | र |
| ■ | ज | वा | न | ■ | प | ती | ■ | को | र | स | ■ |
| पा | ■ | र | का | ना | ■ | स | प | क | ■ | र | जा |
| न | र | ■ | र | क | म | ■ | र | म | मा | ण | ■ |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### एसआयआर पुनरीक्षणाला ४५ दिवसांची मुदतवाढ द्या


अहिल्यानगर- राज्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू असलेली विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया अद्याप पूर्णत्वास गेलेली नसल्याने या प्रक्रियेस किमान ४५ दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी पीस फाऊंडेशनसह विविध सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त यांना पाठविण्यात आले आहे. सामाजिक संघटनांच्या शिष्टमंडळाने बुधवारी (१५ जुलै) प्रभारी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन या प्रक्रियेत नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट अर्शद शेख, भारतीय जनसंसदचे अशोक सब्बन, बबलू खोसला, विजय शिरसाठ, ॲड. विद्या शिंदे, एम. इकबाल, पीपल्स हेल्पलाईनचे वीरबहादूर प्रजापती, रईस शेख, इम्तीयाज शेख, मोहसीन सय्यद, अलफैज सय्यद, सलीम सहारा, अन्सार सय्यद आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, भारतीय लोकशाहीची खरी ताकद मुक्त, निष्पक्ष आणि सर्वसमावेशक निवडणूक प्रक्रियेत आहे. मतदार यादी ही या प्रक्रियेचा पाया असून प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव त्यात समाविष्ट असणे अत्यंत आवश्यक आहे. जर एखाद्या पात्र मतदाराचे नाव यादीतून वगळले गेले किंवा त्रुटी राहिल्या, तर त्याच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकारावर थेट परिणाम होऊ शकतो. सध्या मतदार पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान अनेक नागरिकांना आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, त्यांची पडताळणी करून वेळेत अर्ज सादर करणे यात मोठ्या अडचणी येत आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक, स्थलांतरित कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिक वेळेची गरज आहे. अनेक ठिकाणी जनजागृतीचा अभाव, तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय विलंब यामुळे पात्र मतदारांना आवश्यक कार्यवाही पूर्ण करणे कठीण जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### बेकायदेशीर सावकारीतून गोरगरीबांच्या जमीन बळकाविणाऱ्या सावकारा विरोधात रिपाईचा एल्गार

अहिल्यानगर - बेकायदेशीर सावकारीच्या माध्यमातून मातंग समाजातील एका गरीब कुटुंबाची शेतजमीन फसवणूक करून बळकावल्याचा गंभीर आरोप करत शेंडी पोखर्डी येथील त्या सावकारावर महाराष्ट्र सावकारी अधिनियम तसेच अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा (ॲट्रॉसिटी ॲक्ट) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)च्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली असून, अन्यथा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. यावेळी रिपाईचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, गुलामअली शेख, विजय शिरसाठ, सुनील वाघमोडे, नामदेव उमाप, ताराबाई वाघमारे, वसंत उमाप, उत्तम उमाप, विजय पाटोळे, अरबाज शेख यांच्यासह पीडित उमाप कुटुंबीय उपस्थित होते. निवेदनानुसार, सन २०१६ मध्ये मौजे कोळपे आखाडा, नांदगाव येथील नामदेव मनोहर उमाप, उत्तम मनोहर उमाप, वसंत मनोहर उमाप आणि ताराबाई बबन वाघमारे यांच्या कुटुंबाची गट क्रमांक ११/१ मधील १ हेक्टर १४ आर शेतजमीन आर्थिक अडचणीमुळे शेंडी पोखर्डी येथील सावकाराकडे ३ टक्के व्याजदराने गहाण ठेवण्यात आली होती. या व्यवहारात कुटुंबाने तीन लाख रुपये घेतल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पीडित कुटुंबाचा आरोप आहे की, सावकाराने गहाणखत करण्याऐवजी त्यांना नगर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नेऊन खरेदीखतावर स्वाक्षऱ्या करून घेतल्या. मात्र, त्यावेळी पैसे व्याजासह परत केल्यानंतर जमीन पुन्हा नावावर करून देण्याचे आश्वासन दिल्याचेही निवेदनात म्हटले आहे. या व्यवहारावेळी गावातील दोन व्यक्ती साक्षीदार असल्याचा दावा करण्यात आला असून, त्यांच्या स्वाक्षऱ्याही संबंधित दस्तऐवजावर असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### शितल गुंदेचा यांचे निधन

अहिल्यानगर- शहरातील रतन भुवन निवासी आनंद अगरबत्ती वर्क्सचे आनंद विजयकुमार गुंदेचा यांची धर्मपत्नी शितल आनंद गुंदेचा (वय ४२) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती आणि एक मुलगी असा परिवार आहे.



अतिशय मनमिळाऊ आणि प्रेमळ स्वभावामुळे त्या सर्वांना परिचित होत्या. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

---

# केडगावच्या भैरवनाथ पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

## टाळ, मृदंगाचा गजर अन् विठ्ठल नामाचा जयघोष



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीनिमित्त केडगाव येथील श्री भैरवनाथ पायी दिंडीचे श्रीक्षेत्र पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. ज्ञानोबा–तुकारामच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. टाळ–मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामस्मरणात शेकडो वारकरी भाविकांनी उत्साहाने दिंडीत सहभाग घेतला.

भैरवनाथ पायी दिंडी ही गेल्या ३५ वर्षांची अध्यात्मिक परंपरा जपत वारकरी संप्रदायातील सेवा, श्रद्धा, भक्ती, प्रेम आणि माणुसकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करत आहे. ज्येष्ठ नेते, दिंडीचे मार्गदर्शक असलेले भानुदास एकनाथ कोतकर, सुरेखा भानुदास कोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र पंढरपूरकडे बुधवारी सकाळी दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी उदयनराजे संदीप कोतकर यांनी सांगितले की, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत परंपरेने समाजाला भक्ती, सेवा, समता आणि मानवतेचा मार्ग दाखविला आहे. पंढरपूरची वारी ही केवळ यात्रा नसून मन शुद्ध करणारी, समाजात बंधुभाव वाढविणारी आणि प्रत्येकाला अध्यात्माची अनुभूती देणारी पवित्र परंपरा आहे. श्री भैरवनाथ पायी दिंडीचे मार्गदर्शक भानुदास कोतकर, सुरेखा कोतकर, उद्योजक सचिन कोतकर, दिंडी चालक रामदास महाराज क्षीरसागर, मारुती महाराज जने, भागीनाथ बापू कोतकर, ईश्वर महाराज नवसुपे, भागवत महाराज सातपुते, भिमराज महाराज सातपुते यांच्यासह वारकरी बांधव, ग्रामस्थ, युवक आणि विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री भैरवनाथ पायी दिंडीचे मार्गदर्शक भानुदास कोतकर यांच्या मार्गदर्शनाने माजी महापौर संदीप कोतकर यांच्या संकल्पनेतून सुभाश्री फाऊंडेशनच्यावतीने दिंडीतील वारकऱ्यांच्या सोयी सुविधांसाठी आणि महिलांसाठी फिरते शौचालय भेट देण्यात आले. दिंडीतील वारकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे लक्षात घेऊन वारकऱ्यांना सुविधा मिळाव्यात, या हेतूने सुमारे दहा लाख रुपयांचे दहा फिरते शौचालय भेट देण्यात आल्याची माहिती सुभाश्री फाऊंडेशनचे अध्यक्ष उदयनराजे संदीप कोतकर यांनी दिली. यावेळी आदित्ययनराजे कोतकर उपस्थित होते. दरम्यान, पंढरपूर येथील वारकर्यांच्या सुविधेसाठी संदीप दादा कोतकर युवा मंचच्यावतीने इलेक्ट्रिक गाडी भेट देण्यात आली होती. यंदाही कोतकर कुटुंबियांनी सामाजिक बांधिलकी जपत महिला वारकरी यांच्यासाठी केलेली शौचालायची सुविधा यामुळे महिलांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

सर्वांनी दिंडीतील वारकऱ्यांना शुभेच्छा देत विठ्ठल–रुक्मिणी चरणी सर्वांच्या सुख–समृद्धीची प्रार्थना केली. भक्ती, सेवा आणि समतेचा संदेश देत उत्साहपूर्ण वातावरणात भैरवनाथ दिंडी मार्गस्थ झाली.

---

# मायंबा देवस्थानला विकास म्हस्केंकडून ५५ हजार ५५५ रुपयांची देणगी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** येथील रहिवासी व अभ्युदय बँक शाखा व्यवस्थापक म्हणून मुंबई येथे कार्यरत असलेले विकास देवराव म्हस्के यांनी सावरगाव (ता. आष्टी जि. बीड) येथील श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा देवस्थानला ५५ हजार ५५५ रुपयांची देणगी दिली आहे. म्हस्के यांनी मच्छिंद्रनाथ गड येथे आमदार व गडाचे प्रमुख विश्वस्त आमदार सुरेश धस व बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे ५५ हजार ५५५ रुपयांचा धनादेश नुकताच सुपूर्द केला. यावेळी गडाचे अध्यक्ष चितळे सर, उपाध्यक्ष बाबासाहेब म्हस्के, विश्वस्त नवनाथ चेअरमन, रमेश ताठे, सरपंच मनिषा चंदनशिव, राजेंद्र म्हस्के, शिवाजी बोरूडे, ग्रा. स. ज्ञानेश्वर गायखे, बद्रिनाथ म्हस्के, विठ्ठल भगत, युवानेते अशोक म्हस्के, गणेश म्हस्के आदी मान्यवर उपस्थित होते. सध्या गडावर लोकसहभागातून भव्य समाधी मंदिर निर्माण व विविध विकासकामे प्रगतीपथावर आहे.
शेतकरीपुत्र असलेले विकास म्हस्के जोगेश्वरी मुंबई येथे अभ्युदय बँकेत शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. विकास म्हस्के यांनी यापूर्वीही अयोध्येतील श्रीराम मंदिर, अनाथाश्रम, कोविड सेंटर, रोप–वे, मंदीर परिसर सुशोभीकरण, दर्शनबारी, वृक्ष लागवड, आरोग्य शिबीर, अन्नछत्र अशा अनेक विविध सामाजिक उपक्रम व तसेच यापूर्वी दुष्काळ काळात मुख्यमंत्री सहाय्यता निधी, कोरोना काळात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कोविड–१९ साठी व सन २०११ साली मच्छिंद्रनाथ गडाच्या विकासासाठी प्रत्येकी ५५ हजार ५५५ देणगी दिली आहे. विविध धार्मिक व सामाजिक कार्यात ते सातत्याने मदत करीत असतात.

---

## ढवळपुरी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते संतोष चौगुले यांचे दु:खद निधन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**ढवळपुरी–** भनगडेवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन तथा ढवळपुरी येथील सार्थक किराणा स्टोअर्सचे संचालक संतोष लक्ष्मण चौगुले यांचे वयाच्या ५१ व्या वर्षी सोमवार, दि. १३ जुलै २०२६ रोजी दुःखद निधन झाले.

गोकुळमळा, ढवळपुरी येथील रहिवासी असलेले संतोष चौगुले हे शांत, संयमी, प्रेमळ आणि सर्वांशी आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. सामाजिक, राजकीय तसेच धार्मिक कार्यात ते नेहमीच सक्रिय सहभाग घेत असत. नामदार विजयराव औटी साहेब व आमदार काशिनाथ दाते यांचे समर्थक म्हणून त्यांची परिसरात ओळख होती.



भनगडेवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन म्हणून त्यांनी जबाबदारीने काम करत परिसरातील सहकार चळवळीतही मोलाचे योगदान दिले. त्यांच्या अकाली निधनामुळे ढवळपुरी व परिसरात शोककळा पसरली असून सर्व स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई, भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे.

---

# मोतीबिंदूमुक्त दृष्टीसाठी नीलेश लंके प्रतिष्ठानचा पुढाकार

## ३२ जेष्ठ नागरिक व माता–भगिनी पुण्याकडे रवाना । गरजू नागरिकांना मोफत शस्त्रक्रिया, प्रवास व उपचाराची संपूर्ण जबाबदारी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि जेष्ठ नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली नीलेश लंके प्रतिष्ठानने लौकिकाप्रमाणे समाजोपयोगी उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत गुरुवारी ३२ जेष्ठ नागरिक तसेच माता–भगिनींना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पुणे येथे रवाना करण्यात आले. आर्थिक अडचणींमुळे उपचार घेऊ न शकणाऱ्या नागरिकांसाठी हा उपक्रम मोठा दिलासा ठरत असून, लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा स्पष्ट दृष्टी मिळण्याची आशा दिसून येत होती.

मोतीबिंदूमुळे अनेक जेष्ठ नागरिकांची दृष्टी कमी होत असल्याने त्यांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होतो. मात्र शस्त्रक्रियेचा खर्च परवडत नसल्यामुळे अनेकजण उपचारांपासून वंचित राहतात. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन निलेश लंके प्रतिष्ठानने गरजू लाभार्थ्यांची निवड करून त्यांना पुण्यातील तज्ज्ञ नेत्ररोगतज्ज्ञांकडून मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व लाभार्थ्यांच्या प्रवासाची व्यवस्था, शस्त्रक्रियेचा खर्च, आवश्यक तपासण्या, औषधोपचार तसेच इतर वैद्यकीय सुविधांची संपूर्ण जबाबदारी प्रतिष्ठानने स्वीकारली आहे. त्यामुळे आर्थिक अडचणी उपचारांमध्ये अडथळा ठरू नयेत, याची काळजी घेण्यात आली आहे.

खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली नीलेश लंके प्रतिष्ठान आरोग्य, शिक्षण, सामाजिक विकास आणि जनकल्याणाच्या विविध क्षेत्रांत सातत्याने कार्यरत आहे. ग्रामीण भागातील गरजू कुटुंबांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे, गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मदत करणे, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम राबविणे अशा विविध माध्यमांतून प्रतिष्ठान सामाजिक बांधिलकी जपत आहे. मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा हा उपक्रमही त्याच सेवाभावी कार्याचा एक महत्त्वाचा भाग मानला जात आहे.

मोफत शस्त्रक्रियेसाठी पुण्याकडे रवाना होताना लाभार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी खासदार डॉ. नीलेश लंके तसेच निलेश लंके प्रतिष्ठानचे आभार व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे अनेक गरजू नागरिकांच्या आयुष्यात नव्या आशेचा किरण निर्माण होत असून, पुन्हा एकदा स्वच्छ आणि स्पष्ट दृष्टीने जीवन जगण्याची संधी मिळत असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.

---

## रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान; वाहतूक नियमांचे पालन करण्याचे पोलिसांचे आवाहन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी आणि नागरिकांमध्ये सुरक्षित वाहतुकीबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पैठण पोलिसांनी विशेष रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान राबविले. उपविभागीय पोलिस अधिकारी (डीवायएसपी) सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत महेश चौक, सह्याद्री फाटा आणि गोल नाका परिसरात नागरिकांशी संवाद साधून वाहतूक नियमांचे महत्त्व पटवून देण्यात आले. या अभियानात एपीआय पवार, पीएसआय सारंग, हेड कॉन्स्टेबल वेडे, डाकणे तसेच पोलिस कर्मचारी शिंदे, दुबळे, पठाण, भोजने आणि खिळे यांनी सक्रिय सहभाग घेतला. नागरिकांना हेल्मेट व सीटबेल्टचा अनिवार्य वापर, मद्यप्राशन करून वाहन न चालविणे, वेगमर्यादेचे काटेकोर पालन करणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे तसेच पादचारी आणि ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करून सुरक्षित वाहतुकीची सवय नागरिकांमध्ये रुजविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे पोलिसांनी सांगितले. या जनजागृती मोहिमेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली.

---

# पान दुकानदारांचा आझाद मैदानावर एल्गार; मागण्यांसाठी राज्यव्यापी धडक मोर्चा संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाच्या वतीने पान दुकानदारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारी (दि. १४ जुलै २०२६) मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी धडक मोर्चा व धरणे आंदोलन उत्स्फूर्त वातावरणात पार पडले. राज्यभरातील हजारो पान दुकानदारांनी आपली दुकाने बंद ठेवून या आंदोलनात सहभाग घेतला.

अन्न व औषध प्रशासन तसेच इतर यंत्रणांकडून पान दुकानदारांवर होत असलेल्या कारवायांचा निषेध करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनानंतर महासंघाच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे कॅबिनेट मंत्री नरहरी झिरवळ यांची मंत्रालयात भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री नरहरी झिरवळ यांनी पान दुकानदारांच्या मागण्या गांभीर्याने विचारात घेतल्या जातील तसेच संबंधित विभागाशी चर्चा करून लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल. पान दुकानदारांना न्याय मिळेल, अशी सकारात्मक भूमिका त्यांनी व्यक्त केल्याची माहिती महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

या आंदोलनात मोक्का कायद्याचा चुकीचा वापर थांबविणे, अन्न व औषध प्रशासनाकडून होणाऱ्या अन्यायकारक कारवाया रोखणे, सुगंधी तंबाखूवरील बंदीचा पुनर्विचार करणे, पान शॉप व्यावसायिकांना आर्थिक मदत, अनुदान व विनातारण कर्ज उपलब्ध करून देणे, पान व्यवसायाच्या विकासासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करणे आदी प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

या राज्यव्यापी आंदोलनाचे नेतृत्व महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अजित सूर्यवंशी, कार्याध्यक्ष शरद मोरे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष फैय्याज तांबोळी, लातूर जिल्हाध्यक्ष मसूद काझी, सांगली जिल्हाध्यक्ष रत्नाकर नांगरे, दिनेश बरंवाल, अजिंक्य पाटील यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांनी केले.

महासंघाच्या वतीने या आंदोलनाला महाराष्ट्रभरातून मोठा प्रतिसाद मिळाल्याचा दावा करण्यात आला असून, पान दुकानदारांच्या न्याय्य मागण्या मान्य होईपर्यंत संघटनेचा लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

# फिनिक्स फाऊंडेशनने हजारो वारकऱ्यांना पुरवली आरोग्यसेवा

## नेत्रदान व अवयवदानची दिंडीतून जागृती; २४ वर्षापासूनचा अविरत उपक्रम
## वारकऱ्यांच्या सेवेतच पांडूरंगाचे दर्शन – जालिंदर बोरुडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीसाठी पंढरपूरला निघालेल्या वारकऱ्यांची दिंडी सुखकर होण्यासाठी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने आरोग्य सेवा पुरविण्यात आली. शहरातून मार्गक्रमण झालेल्या विविध दिंडीतील हजारो वारकऱ्यांची तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीमध्ये नेत्र व आरोग्य तपासणी करुन त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले. तर दिंडीत मरणोत्तर नेत्रदान व अवयवदानची जागृती करण्यात आली.

गेल्या २४ वर्षापासून फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे हा उपक्रम राबवत असून, दरवर्षी संत निवृत्तीनाथ महाराज (नाशिक), मुक्ताई



महाराज (जळगाव), जंगले शास्त्री महाराज (डोंगरगण) आदी लहान–मोठ्या दिंडीतील वारकऱ्यांना आरोग्य सुविधा पुरविण्याचे कार्य सातत्याने सुरु आहे. ज्या वारकऱ्यांना औषधोपचाराची गरज भासली त्यांना मोफत औषधोपचार देखील करण्यात आले.

जालिंदर बोरुडे म्हणाले की, वारकऱ्यांच्या सेवेतून पांडूरंगाच्या भक्तीचा आनंद मिळतो. वारकरी सांप्रदाय समाज जागृतीचे कार्य करत असून, त्यांच्या माध्यमातून मरणोत्तर नेत्रदान व अवयवदान चळवळ यशस्वी होणार आहे. वारकऱ्यांना आरोग्य सेवा देताना दिंडीत नेत्रदान व अवयवदान चळवळीची जागृती देखील सातत्याने सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. तर नामस्मरणाने अंतकरण शुद्ध होते तर बाह्य शरीरासाठी आरोग्य

# वारकरी परंपरा ही समाजाला समतेसह संस्कारांची दिशा देणारी जीवनशाळा – महापौर ज्योतीताई गाडे

## शिंदवड ते पंढरपूर पायी दिंडीचे श्री स्वामी समर्थ मंदिरात भव्य स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील श्रीक्षेत्र शिंदवड येथून आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या श्री निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडीचे सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात भाविकांच्या वतीने अत्यंत भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. टाळ-मृदुंगांच्या निनादात, ''ज्ञानोबा-तुकाराम'' आणि ''विठ्ठल विठ्ठल''च्या अखंड गजरात दिंडी मंदिर परिसरात दाखल होताच संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

मंदिरातील भाविकांनी दिंडीतील जि वनेश्वर काळुबाबा रथाचे पूजन करून विणेकरी हभप भाऊसाहेब मोरे यांची पाद्यपूजा केली. मंदिराच्या सेवेकरी बांधवांनी रस्त्यावर आकर्षक रांगोळ्या, फुलांची सजावट करून दिंडीचे स्वागत केले. दिंडीचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली, तर महिलांनी रथातील पादुकांचे औक्षण करून विठ्ठलनामाच्या गजरात आरती केली. यावेळी हभप अनिरुद्ध निर्मळ, हभप भाऊसाहेब मोरे, हभप बापूभाऊ बस्ते,हभप गोविंद बस्ते,हभप विलास बस्ते, हभप नामदेव बस्ते, हभप राकेश बस्ते, भाविक उपस्थित होते.

रात्री मंदिर परिसरात समस्त शिंदवड ग्रामस्थ व वारकरी परिवाराच्या वतीने संगीत हरिपाठ सादर करण्यात आला. त्यानंतर झालेल्या कीर्तनात हभप वसंत महाराज थोरमिसे यांनी ''अवघा रंग एक झाला'' या अभंगाच्या माध्यमातून आषाढी वारीचे आध्यात्मिक आणि सामाजिक महत्त्व उलगडून सांगितले. तसेच अमोल गाडे यांनी सांगितले की वारी माणसाला स्वावलंबन, नम्रता, समता आणि आत्मपरीक्षणाची शिकवण देते. जात, पंथ, श्रीमंती-गरिबीचे भेद विसरून सर्वांना एकाच विठ्ठलभक्तीच्या सूत्रात बांधणारी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची अनमोल परंपरा असल्याचे ते म्हणाले.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाले की ''आषाढी वारी ही केवळ पंढरपूरच्या दिशेने चालणारी पायी यात्रा नसून ती माणसाच्या अंतर्मनाला शुद्ध करणारी अध्यात्माची वाट आहे. वारकरी संप्रदायाने शतकानुशतके समाजात समता, बंधुभाव, शिस्त आणि सेवाभावाचे संस्कार रुजवले आहेत. टाळ, मृदुंग आणि हरिनामाच्या गजरातून समाजाला एकत्र आणण्याचे कार्य वारी आजही प्रभावीपणे करत आहे. ही परंपरा जपणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.''असे सौ.गाडे यांनी स्पष्ट केले

''आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात माणूस मानसिक ताणतणावात अडकत चालला आहे. अशा काळात वारकरी संप्रदाय संयम, सहकार्य, परस्पर सन्मान आणि निःस्वार्थ सेवेचे मौल्यवान धडे देतो. विठ्ठलभक्तीची ही अखंड परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेतला पाहिजे. अशा दिंड्यांचे स्वागत करणे म्हणजे आपल्या संस्कृतीचा आणि संतपरंपरेचा सन्मान करण्यासारखे आहे.''असे हभप भाऊसाहेब मोरे यांनी म्हटले आहे.

# गृहमंत्र्यांनी संपूर्ण अमली पदार्थ परिसंस्था नष्ट करण्यासाठी तीन वर्षांचा रोडमॅप सादर केला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारताच्या अंतर्गत सुरक्षेशी संबंधित गुंतागुंतीच्या आणि अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णायक नेतृत्वाचा विचार केला जातो, तेव्हा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे नाव ठळकपणे समोर येते. स्पष्ट रणनीती, कालबद्ध नियोजन आणि परिणामाभिमुख अंमलबजावणी ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये बनली आहेत. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांना यशस्वीपणे निर्णायक टप्प्यावर नेल्यानंतर आता त्यांचे पुढील ध्येय म्हणजे भारताला अमली पदार्थ आणि नार्को-दहशतवादाच्या संपूर्ण परिसंस्थेतून मुक्त करणे हे आहे.

हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी गृहमंत्र्यांनी केवळ अमली पदार्थांच्या जप्तीत वाढ करण्यापुरता मर्यादित न राहता, उत्पादन, तस्करी, वित्तपुरवठा आणि वितरण या संपूर्ण साखळीचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने व्यापक तीन वर्षांचा रोडमॅप तयार केला आहे. या दृष्टीकोनातून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे नार्को-कोऑर्डिनेशन सेंटर (एनसीओआरडी)ची दहावी सर्वोच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीदरम्यान व्हिजन डॉक्युमेंट ऑन ड्रग कंट्रोल (२०२६२०२९) प्रकाशित करण्यात आले, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी) चा वार्षिक अहवाल सादर करण्यात आला आणि सुमारे ६,००० कोटी मूल्याचे जप्त करण्यात आलेले २,०९,५०० किलोग्रॅम अमली पदार्थ नष्ट करण्यासाठी ऑनलाइन ड्रग डिस्पोजल फोर्टनाईट कॅम्पेन सुरू करण्यात आले. ही केवळ एक नियमित सरकारी बैठक नव्हती, तर ठोस कृतींना कालबद्ध रणनीतीची जोड देत ''अमली पदार्थमुक्त भारत'' या उद्दिष्टाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नशामुक्त भारत या संकल्पनेनुसार अमित शाह यांनी ''डिटेक्ट, डिसरप्ट अँड डिस्ट्रॉय'' या तत्त्वावर आधारित स्पष्ट आणि बहुस्तरीय रणनीती तयार केली आहे. या धोरणाची सुरुवात अमली पदार्थांच्या नेटवर्कची अचूक ओळख पटविण्यापासून होते. त्यानंतर पुरवठा साखळी, आर्थिक पायाभूत व्यवस्था आणि कार्यप्रणाली विस्कळीत करून अखेरीस संपूर्ण परिसंस्थेचे अशा प्रकारे निर्मूलन करण्याचे उद्दिष्ट आहे की ती पुन्हा उभी राहू शकणार नाही. पुढील तीन वर्षांसाठी ही चौकट भारताच्या राष्ट्रीय अमली पदार्थविरोधी धोरणाचा मुख्य आधार ठरणार आहे. अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली भारताची अमली पदार्थांविरोधातील मोहीम गेल्या काही वर्षांत अभूतपूर्व वेगाने पुढे सरकली आहे.

शून्य सहनशीलता आणि नेटवर्क-केंद्रित अंमलबजावणी या धोरणाच्या मार्गदर्शनाखाली, २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर भारताने सुमारे




१.८४ लाख कोटी मूल्याचे अमली पदार्थ जप्त केले आहेत, जवळपास ९०,००० कोटी मूल्याचे अमली पदार्थ नष्ट केले आहेत, लाखो किलोग्रॅम अमली पदार्थ जप्त केले आहेत आणि बेकायदेशीर अफू लागवडीविरोधात विक्रमी कारवाई केली आहे. ही आकडेवारी केवळ कायदा अंमलबजावणी यंत्रणांच्या प्रभावी कार्यक्षमतेचेच नव्हे, तर अमली पदार्थांच्या संपूर्ण परिसंस्थेचे मुळापासून उच्चाटन करण्यासाठी अमित शाह यांच्या परिणामाभिमुख रणनीतीचे आणि दृढ निश्चयाचेही प्रतीक आहे.

अमित शाह यांच्या नेतृत्वाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांचे मोजता येण्याजोग्या परिणामांमध्ये रूपांतर करण्याची त्यांची बांधिलकी. त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये स्पष्ट उद्दिष्टे, कालबद्ध अंमलबजावणी आणि कठोर अंमलबजावणी यांचा समन्वय साधून भारतासमोरील सर्वात कठीण अंतर्गत सुरक्षा आव्हानांना तोंड दिले गेले आहे. कलम ३७० रद्द करणे, डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादाविरोधातील निर्णायक कारवाई आणि भारताची अंतर्गत सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम हे या प्रशासन पद्धतीची ठळक उदाहरणे आहेत. या उपाययोजनांमुळे अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या आव्हानांवर मोठ्या प्रमाणात मात करण्यात यश आले आहे. आता त्याच निर्धाराने अमित शाह यांनी अमली पदार्थमुक्त भारत हे राष्ट्रीय अजेंड्यावरील सर्वोच्च प्राधान्याचे उद्दिष्ट बनविले आहे. हा तीन वर्षांचा रोडमॅप केवळ अमली पदार्थांच्या तस्करीवर नियंत्रण ठेवण्यापुरता मर्यादित नसून, नार्को-दहशतवादाच्या संपूर्ण परिसंस्थेचे मुळापासून उच्चाटन करण्याचे ध्येय त्यामागे आहे. निर्धारित कालमर्यादेनुसार या रणनीतीची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास, अमली पदार्थ आणि नार्को-दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात भारताला आजवरचे सर्वात व्यापक आणि निर्णायक यश मिळवून देण्याची क्षमता या योजनेत आहे.

# करिअर संसद महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासाठी दिशा दर्शक - डॉ अभिजित कुलकर्णी

## जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त अहमदनगर महाविद्यालयात करिअर संसद पदाधिकारी शपथग्रहण समारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत जागतिक युवा कौशल्य दिन (१५ जुलै) निमित्त करिअर संसद पदाधिकारी शपथग्रहण समारंभ उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजित कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. दिलीपकुमार भालसिंग, उपप्राचार्य डॉ. विलास नाबदे तसेच प्रबंधक (रजिस्ट्रार) श्रीमती कल्पलता भिंगारदिवे उपस्थित होते. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष श्री. यशवंत शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

संयुक्त राष्ट्र महासभेने २०१४ मध्ये १५ जुलै हा दिवस जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून घोषित केला. युवकांमध्ये कौशल्य विकास, रोजगारक्षमता, उद्योजकता आणि शाश्वत विकासाबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण (-४) आणि सन्मानजनक रोजगार व आर्थिक विकास (-८) या शाश्वत विकास उद्दिष्टांना चालना देणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. याच उद्देशाने महाविद्यालयात करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करून त्यांना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात आली.

करिअर संसदेच्या मंत्रिमंडळात पुढील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली : मुख्यमंत्री रोहित बप्पासाहेब काकडे नियोजन मंत्री स्नेहल कैलास गोरडे कायदा व शिस्तपालन मंत्री कोमल भाऊसाहेब सटाले सामान्य प्रशासन मंत्री साक्षी सुरेश भोसले माहिती व प्रसारण मंत्री सुहानी मुकुंद वाबळे उद्योजकता विकास मंत्री गीतांजली भगवान जगताप स्वयंरोजगार विकास मंत्री पंकज किशोर घोडके कौशल्य विकास मंत्री ज्ञानेश्वरी धनंजय जाधव संसदीय कामकाज मंत्री शशिकांत विनोद गोरडे महिला व बालकल्याण मंत्री श्रुती सुभाष वांडेकर सभासद श्रद्धा जालिंदर कोरडे, यावेळी विद्यार्थ्यांना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजित कुलकर्णी यांनी सांगितले की, ''करिअर संसद हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी, नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी आणि भविष्यातील ध्येय निश्चित करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून उपलब्ध होणाऱ्या संधींचा पुरेपूर लाभ घ्यावा.''

या प्रसंगी राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुधीर वाडेकर व डॉ. सचिन राळेगणकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन करिअर कट्टा समन्वयक डॉ. भागवत परकाळ यांनी केले.

# आंतरशालेय योगासन स्पर्धा उत्साहात

## कै. विजया (ताई) शिवलकर स्मृतिप्रीत्यर्थ पालवी शिशुविहारचा उपक्रम; १५ शाळांचा उत्स्फूर्त सहभाग




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी नाका येथील पालवी शिशुविहारमध्ये कै. विजया (ताई) शिवलकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आलेली आंतरशालेय योगासन स्पर्धा व बक्षीस वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सलग तिसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत अहिल्यानगर शहरातील १५ शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्पर्धा इयत्ता चौथी ते सहावी आणि सातवी ते नववी अशा दोन गटांत घेण्यात आली. स्पर्धेचे परीक्षण योग विद्या धामचे सदस्य शेखर एडके, संदीप मुळे, संदीपराव बारगळ, अनिरुद्ध भागवत, प्रीती लेले, नीलिमा म्हस्के, सुषमा कदम आणि शिल्पा साठ्ये यांनी केले.

बक्षीस वितरण समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना हार्ट बीट हॉस्पिटलच्या व्यवस्थापन प्रमुख डॉ. संगीता कदम म्हणाल्या, ''योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. विद्यार्थीदशेतच योग जीवनाचा अविभाज्य भाग बनला, तर सशक्त, निरोगी आणि समृद्ध भारत घडविणे शक्य होईल.'' संस्कारक्षम शिक्षण देणाऱ्या पालवी शिशुविहारसारख्या शाळांची आजच्या काळात नितांत गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.स्पर्धेचे आयोजक वैद्य अनिकेत घोटणकर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल जागरूकता निर्माण करणे, योगाच्या माध्यमातून एकाग्रता वाढविणे आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणे हा या स्पर्धेमागील प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमास विद्याभारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष डॉ. अरुण कुलकर्णी, महिला मंडळ बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मितताई शूळ यांच्यासह शरदजी झोटिंग, राजेंद्रजी सोनार, जगदीशजी मुथा, रवींद्रजी करंदीकर, योग विद्या धामचे संस्थापक सदस्य दत्ताजी दिकोंडा, शोभनाताई वाळिंबे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी उपक्रमाचे कौतुक करून आयोजकांचे अभिनंदन केले.

(पान १ वरून)

## उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी सकल मातंग समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा

अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समितीची स्थापना केली होती. समितीने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून, विविध राज्यांमधील उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेचा आढावा घेत आवश्यक माहिती व तथ्यांचे संकलन केले. त्यानंतर मार्च २०२६ मध्ये समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केला. यानंतर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीमार्फत विविध समाजघटकांकडून सूचना व हरकती मागविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. मात्र, सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही शासनाकडून अंतिम निर्णय जाहीर करण्यात आलेला नाही, अशी खंत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी शासनाने चालू पावसाळी अधिवेशनात अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा निर्णय घेऊन तो तात्काळ लागू करावा, लाभवंचित समाजघटकांना अतिरिक्त मागासलेपणाचा लाभ द्यावा तसेच आरक्षणातील अनुशेष (बॅकलॉग) भरून काढावा, अशी मागणी करण्यात आली. शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. मोर्चा व निवेदनाद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला असून समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजकीय दबाव झुगारून गुन्हेगारी टोळ्यांचा बिमोड करा

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी आणि सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बैठकीतील मुख्य ॲक्शन प्लॅन:**

राजकीय दबाव झुगारा: गुन्हेगारांचा कुठलाही गॉडफादर असला तरी मागे हटू नका. कायदा हातात घेणाऱ्यांवर निर्धास्तपणे कारवाई करा. जिल्ह्याची प्रतिमा सुधारा: वाढत्या गुन्हेगारी आलेखामुळे मलीन झालेली जिल्ह्याची प्रतिमा पुन्हा सुधारण्यासाठी पोलिसांनी रस्त्यावर उतरून आक्रमक कामगिरी करावी. अवैध धंद्यांवर सर्जिकल स्ट्राईक: जिल्ह्यात सुरू असणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अवैध व्यवसायांना तात्काळ कुलूप लावा आणि रात्रीची गस्त वाढवून संशयितांवर बारीक लक्ष ठेवा. सर्वसामान्यांना न्याय:* पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सन्मानाची वागणूक द्या. मात्र, गुन्हेगारांशी डील करणाऱ्या किंवा त्यांना पाठीशी घालणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवरही बडतर्फीची कारवाई केली जाईल, असा सज्जड दम येनपुरे यांनी दिला. थोडक्यात काय तर...

विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांच्या या अत्यंत कणखर आणि झिरो टॉलरन्स भूमिकेमुळे राजकीय आडोसा घेऊन फिरणाऱ्या गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत, तर दुसरीकडे अहिल्यानगर पोलीस आता पूर्णपणे ॲक्शन मोडवर आल्याचे पाहायला मिळत आहे.

## छत्रपती संभाजीनगरला शुद्ध व नियमित पाणीपुरवठ्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

हे शासनाचे कर्तव्य असून यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. बैठकीत कंत्राटदाराच्या कामाचे नियमित मूल्यांकन करण्यासह टप्पानिहाय आराखडा तयार करून पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच खोदलेल्या रस्त्यांचे रेस्टोरेशन तातडीने पूर्ण करून पावसाळ्यात खड्ड्यांमुळे अपघात होणार नाहीत, याची खबरदारी घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. बैठकीला सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, खासदार संदीपान भुमरे, आमदार सतीश चव्हाण, माजी खासदार डॉ. भागवत कराड यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## महापालिका कर्मचाऱ्यांवरील अतिरिक्त कामाचा ताण तातडीने कमी करा

कर्मचाऱ्यांना ठरावीक वसुलीचे उद्दिष्ट देऊन ती पूर्ण न झाल्यास कारवाईच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. युनियनने निवेदनात म्हटले आहे की, जीएसटीचे अनुदान महिन्याच्या सुरुवातीलाच प्राप्त होऊनही कर्मचाऱ्यांना अतिरिक्त शासकीय कामात गुंतविल्यामुळे वेतन बिले तयार करण्यात उशीर झाला. शनिवार-रविवार सुट्टीच्या दिवशीही अधिकारी व कर्मचारी बिलांचे काम करत होते. तरीदेखील १३ जुलैपर्यंत जून २०२६ महिन्याचे वेतन व पेन्शन अदा झाले नव्हते. महिनाभर अत्यावश्यक सेवा देऊन आणि अतिरिक्त शासकीय कामे करूनही वेतन वेळेवर मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. मुलांच्या शाळा सुरू झाल्याने फी, वह्या-पुस्तके आणि घरखर्च भागविण्यासाठी कर्मचाऱ्यांना खासगी सावकारांसमोर हात जोडावे लागत आहेत. किराणा दुकानदारही उधारी देण्यास टाळाटाळ करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. युनियनने आरोप केला आहे की, अतिरिक्त शासकीय कामे करताना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांना सन्मानाची वागणूक मिळत नाही. वेळेत काम पूर्ण न झाल्यास निलंबनाच्या धमक्या दिल्या जातात. दुसरीकडे महानगरपालिकेची कामे अपूर्ण राहिल्यास नागरिक, पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांच्या रोषालाही सामोरे जावे लागते. त्यामुळे कर्मचारी सातत्याने मानसिक तणावाखाली काम करत आहेत.

याच पार्श्वभूमीवर आरोग्य विभागातील बिगारी/शिपाई कै. राजेंद्र बबन फुलारी यांनी अतिरिक्त कामाचा ताण, एसआयआर अंतर्गत बीएलओ म्हणून सोपविण्यात आलेली अतिरिक्त जबाबदारी आणि त्यानंतर झालेल्या प्रशासकीय कारवाईच्या धक्क्यामुळे मानसिक नैराश्यात जाऊन गळफास घेत आत्महत्या केल्याचा दावा युनियनने निवेदनात केला आहे. या घटनेबद्दल महानगरपालिका प्रशासन व शासनाचा जाहीर निषेध करण्यात आला आहे.

कै. राजेंद्र फुलारी यांच्यावर आलेली वेळ इतर कोणत्याही महापालिका कर्मचाऱ्यावर येऊ नये, यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी युनियनने केली आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांवरील अतिरिक्त शासकीय कामांचा बोजा कमी करून अत्यावश्यक सेवांवर परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी. निवडणुका, जनगणना, बीएलओ, बोगस मतदार शोध मोहीम यांसारखी कामे इतर शासकीय विभागातील कर्मचाऱ्यांनाही सोपवावीत आणि महानगरपालिका कर्मचाऱ्यांना या अतिरिक्त जबाबदाऱ्यांमधून मुक्त करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यापुढेही अतिरिक्त कामाचा ताण कायम ठेवण्यात आल्यास अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनच्या नेतृत्वाखाली सर्व कर्मचारी बेमुदत तीव्र आंदोलन छेडतील, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

## अंबिका देवस्थान, देविभोयरे ट्रस्टला ब वर्ग दर्जा

जनतेचा विश्वास आणि आशीर्वाद हीच माझ्या सार्वजनिक जीवनातील सर्वात मोठी ताकद आहे. मतदारसंघातील प्रत्येक गावाच्या विकासाबरोबरच धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपणे हीदेखील आपली सामूहिक जबाबदारी आहे.''

यावेळी देवस्थान अध्यक्ष शिवाजीराव जाधव, मा. उप सरपंच विकास सावंत, गणेश देवराम बेलोटे, , विश्वनाथ गाजरे, बाबुराव मुळे, गोपीचंद बेलोटे, विजय बेलोटे, सुभाष बेलोटे, संपत वाळुंज, संतोष बेलोटे, दत्तात्रय बेलोटे, बाबुराव बेलोटे, ज्ञानदेव बेलोटे, शहाजी बेलोटे, जगन बेलोटे, रामदास बेलोटे, विश्वनाथ बेलोटे, भाऊसाहेब बेलोटे, अजिंक्य बेलोटे, अक्षय बेलोटे, संतोष केदारी, राहुल केदारी, सुनील आरोटे, भाऊसाहेब सरडे, अमोल गजरे, शरद बोरुडे, सिताराम आरोटे, बबन बेलोटे, साहेबराव गुंड, हर्षद झावरे, दिनेश गायकवाड, अतुल मुळे, प्रमोद मोरे, संजय बेलोटे, नारायण माळी, संपत तिकोणे, संतोष सरडे, अरविंद बेलोटे, कमलाकर बेलोटे (मेजर), सत्यवान बेलोटे, दत्ता थोरात, सखाराम बेलोटे, रामकृष्ण दरेकर यांच्यासह देविभोयरे व परिसरातील भाविक, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंबिका देवस्थानाला मिळालेल्या ब वर्ग दर्जामुळे देवस्थानाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या यशामागे आमदार काशिनाथ दाते सर यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि जनहितासाठीची कटिबद्ध भूमिका निर्णायक ठरल्याचे सांगत ग्रामस्थांनी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. देवस्थानाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक बाबतीत भविष्यातही आमदार दाते सर यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभेल, असा विश्वासही उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

''अंबिका देवस्थानाला ब वर्ग दर्जा मिळावा ही आमच्या गावाची अनेक वर्षांपासूनची प्रलंबित मागणी होती. नवरात्रोत्सवाच्या काळात आमदार काशिनाथ दाते सर देविभोयरे येथे आले असताना आम्ही ही मागणी त्यांच्यासमोर मांडली. त्यावेळी सरांनी हा विषय मार्गी लावल्याशिवाय शांत बसणार नाही, अशी ग्वाही दिली होती. त्यानंतर त्यांनी मंत्रालयीन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून अखेर देवस्थानाला ब वर्ग दर्जा मिळवून दिला. या यशाचे सर्वाधिक श्रेय आमदार काशिनाथ दाते सर यांनाच जाते. तसेच या कामासाठी सहकार्य करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, नामदार राधाकृष्ण विखे पाटील, मा. नामदार जयकुमार गोरे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.''
– शिवाजीराव जाधव

''देवस्थानाला ब वर्ग दर्जा मिळणे हे देविभोयरे गावासाठी ऐतिहासिक यश आहे. ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. आमदार काशिनाथ दाते सरांनी नवरात्रोत्सवात गाव भेटीदरम्यान आमचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि मंत्रालयात सातत्याने पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले होते. आज ते आश्वासन पूर्ण झाले, याचा आम्हा सर्व ग्रामस्थांना आनंद आणि अभिमान आहे. आमदार दाते सरांनी दिलेला शब्द पाळल्यामुळेच हे यश शक्य झाले. या निर्णयासाठी पाठपुरावा करणारे महायुतीचे सर्व पदाधिकारी तसेच नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेब, मा. नामदार जयकुमार गोरे साहेब, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही आम्ही मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.''
– विश्वनाथ गाजरे गुरूजी

## अवैध दारू धंद्यांवर छाप्यात साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

दारू जप्त करण्यात आली असून, नितीन सुरेश शिंदे (वय ४८, रा. पुणतांबा, राहाता) याला अटक करण्यात आली आहे, तर महाराष्ट्र वाईन्सचा (शिवाजी चौक, श्रीरामपूर) चालक फरार आहे.

भिंगार कॅम्प हद्दीतून आकाश आजिनाथ रासकर (वय २४, रा. चौधरीनगर, सोलापूर रोड) याच्याकडून ३,३७० रुपयांची दारू जप्त करण्यात आली. मिरजगाव पोलीस ठाणे हद्दीत दोन वेगवेगळ्या कारवाया करण्यात आल्या. यात गणेश रमेश टकले (वय २५, रा. गुरवपिंप्री, कर्जत) याच्याकडून ६,९८५ रुपयांची, तर ऋषिकेश संजय मुळे (वय २२, रा. मुळेवाडी, कर्जत) याच्याकडून १४,१७५ रुपयांची देशी-विदेशी दारू जप्त करण्यात आली.